तरुण भारत
रविवार, २४ एप्रिल २०२२

# दोडामार्ग महाविद्यालयात करियरविषयक मार्गदर्शन



दोडामार्ग : हळबे महाविद्यालयात करियर कट्टाविषयी मार्गदर्शन करताना प्रा. आर.एस. गावडे, सोबत इतर.

वार्ताहर
दोडामार्ग

नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या 'करियर कट्टा' उपक्रमाबाबत प्रा. आर. एस. गावडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना करियरविषयी मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व करियर कट्टा समन्वयक प्रा. एस. एस. पाडगांवकर उपस्थित होते. विद्यार्थीदशेत असताना विद्यार्थ्यांसमोर अनेक प्रलोभने असतात. परंतु त्यांचा विचार न करता जर विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांचा विचार करून त्यासाठी प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते, असे मत प्रा. आर. एस. गावडे यांनी मांडले. पदवीसोबत विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये विकसित करून त्याद्वारे उत्कृष्ट उद्योजक बनू शकता, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी केले. महाविद्यालयातून किमान १५ विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना संपूर्ण मार्गदर्शन महाविद्यालयातर्फे केले जाईल, असा निर्धार त्यांनी यावेळी करण्यात आला. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. एस. एस. पाडगावकर यांनी तर आभार प्रा. पी. एस. प्रसादी यांनी मानले.